<u>रे.दि.मु.नं. २२९/२०१४ मधील निशाणी २२ खालील आदेश</u>
<u>(शोभावती वाघमोडे व इतर वि.शिवाजी पाटील व इतर)</u>
**<u>CNR No.MHSO20000935-2014</u>**

प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द निरंतरची ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. यात वादीतर्फे विनंती अर्ज की, सदरहु दाव्याचे काम पाहण्याकरीता अनिलकुमार गणपत पाटील यांना दिलेल्या अधिकाराबाबत सौ. विजया अनिलकुमार पाटील व शोभावती पांडूरंग वाघमोडे यांनी करुन दिलेले कुलमुखत्यार पत्राच्या अस्सलप्रती फेरीस्त सोबत दाखल करीत आहेत. तरी सोबतचे कागद दाखल करणेस परवानगी मिळावी.

२. यात प्रतिवादींतर्फे म्हणणे दिले आहे की, वादींचा अर्ज खरा व प्रतिवादी यांना मान्य नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. सदरच्या अर्जावर दोन्हीं वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जावरुन असे दिसून येते की, वादींनी दाव्याचे कामकाज पाहण्यासाठी कुलमुखत्यार यांना कुलमुखत्यारपत्राद्वारे अधिकार दिलेले आहेत. सदरची कागदपत्रे दाखल करुन घेतल्याने प्रतिवादीच्या न्याय्य हक्कावर परिणाम होणार नाही. याउलट, वादी व प्रतिवादी यांचे मधील वाद मिटणेस मदत होणार आहे. वादींना त्यांचे कथनापृष्ठ्यर्थ कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी न दिल्यास वादीवर अन्याय होणार आहे. प्रतिवादींना योग्य ती संधी दिली जाणार आहे. त्यामुळे ही सर्व परिस्थीती लक्षात घेता अर्ज मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.२२) चा मंजूर करण्यात येतो.
२. फेरीस्त नि. २३ सोबतचे कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

SEEMA KETAN DESHMUKH
Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2022.07.16 11:22:00 +0530

सांगोला. ( सौ. एस. के. देशमुख )
दिनांक – १५/०७/२०२२ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सांगोला

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | S. P. Parekar |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C., Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 15/07/2022 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 15/07/2022 |